# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 155 |
| स्थळ | : | विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| वार व दिनांक | : | शनिवार, दिनांक : 9 एप्रिल 2016 |
| वेळ | : | सकाळी 11.30 |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

# कार्यवृत्त

155 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, शनिवार, दिनांक 9 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 11.30 वाजता, विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा. श्री.हेमंत टकले, मुंबई — सदस्य
3. मा. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग — सदस्य
4. मा. श्री. ज्ञानदेव नाठे, संचालक,तंत्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी — सदस्य
5. मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली — सदस्य
6. मा. डॉ. एस.ए. ठोंबरे. औरंगाबाद — सदस्य
7. डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव — सचिव

वित्त अधिकारी, वित्त विभाग आणि परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग हे निमंत्रित म्हणून बैठकीस हजर होते.

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

1. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा. संचालक,उच्च शिक्षण, पुणे — सदस्य
5. मा. श्री.वाकडे प्रफुल, संचालक, व्यावसायिक व प्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी — सदस्य
6. मा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी,जळगाव — सदस्य
7. मा. श्री. उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
8. मा. डॉ. डब्ल्यु. एन.गाडे, कुलगुरु, पुणे — सदस्य
9. मा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी,जळगाव — सदस्य
10. मा. श्री. उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
11. मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई — सदस्य
12. मा. डॉ. बंदी व्यंकटेशवारलू, कुलगुरु, परभणी — सदस्य
13. मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 155.1.0 | | स्वागत<br>मा. कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. व बैठकीस सुरवात करण्यात आली. |
| 155.2.0 | 155.2.1 | दि. 22 मार्च 2016 रोजी झालेल्या 154 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून त्यावर मा. कुलगुरू यांनी स्वाक्षरी करणे. (कार्यवृत्त पा.क्र. 1 ते 18)<br>**व्य.मं.ठराव: दि. 22 मार्च 2016 झालेल्या 154 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तांत वाचून कायम करुन त्यावर मा.कुलगुरु यांनी स्वाक्षरी केली.** |
| 155.3.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| 155.4.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 155.4.1<br>व्य.मं.बैठक<br>154.5.6 | **विद्यापीठाने सन 2008 मध्ये करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याबाबत**<br>(टिपणी- महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.वायएमयु-2013 (41/13) विशि-1 दि.25.2.2014 अन्वये सहायकांची 50 पदे व शिपाई 21 अशी एकूण 71 पदे मंजुर केली आहेत. (परिशिष्ट 1) |

महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र.वायएमयु-2013 (41/13) दिनांक 25.2.2014 अन्वये विद्यापीठाने सन 2008 मधे करार पद्धतीने नियुक्त केलेल्या 17 कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ सेवेत सामावून घेण्यास मान्यता दिली आहे. (परिशिष्ट 2)

सदर शासननिर्णय दि. 29.11.2014 रोजीच्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्याबाबत व्यवस्थापन मंडळाने ठराव क्र.146-4-21 अन्वये खालीलप्रमाणे ठराव केला आहे.

"शासन आदेशान्वये सुरूवातीपासून झालेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मा.कुलसचिव यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या उमादेवी विरूद्ध स्टेट ऑफ कर्नाटक यांच्या जजमेंटनुसार व विविध न्यायालयाच्या निर्णयानुसार विद्यापीठास नव्याने मंजूर झालेल्या 71 पदांची कार्यवाही करताना सर्व 71 पदांची जाहिरात देण्यात यावी. 17 पदे भरताना उद्भणाऱ्या सर्व अडचणींची माहिती महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागास पत्राने कळवून जाहिरातीद्वारे पदे भरण्यास परवानगी मागवून त्यानंतर कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात आली. (परिशिष्ट 3)"

यासंदर्भात विद्यापीठाने मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.23.2.2015 रोजी मार्गदर्शन करणेबाबत व 17 पदे भरताना उद्भवणाऱ्या अडचणी पत्राद्वारे कळविण्यात आल्या होत्या. (परिशिष्ट 4)

तसेच या 17 कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सिव्हिल रिट पिटीशन क्र.33628 (2014 चा) अन्वये याचिका दाखल केली होती. ही याचिका मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.15.1.2015 रोजी याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी withdraw करणेच्या विनंतीनुसार याचिका निकाली (disposed) काढली आहे.

विद्यापीठाने शासनाला दिनांक 6.8.2015 रोजी पहिले स्मरणपत्र (परिशिष्ट 5), दिनांक 9.9.2015 रोजी दुसरे स्मरणपत्र (परिशिष्ट 6), दिनांक 1.10.2015 रोजी तिसरे स्मरणपत्र (परिशिष्ट 7) पाठविले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांच्या दिनांक 1.1.2016 रोजीच्या पत्रात दि. 25.2.2014 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पदे निर्माण करून व दि. 25.2.2014 रोजीच्या पत्रान्वये 17 कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेण्यास मान्यता देण्यात आल्याचे व त्यानुसार प्रक्रिया अवलंबून पुढील आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.
(परिशिष्ट 8)

सदर पत्राबाबत विद्यापीठाने मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.3.2.2016 रोजी भविष्यात उद्भवणाऱ्या गंभीर समस्यांबाबत सविस्तर पत्र पाठविले आहे.
(परिशिष्ट 9)

या पत्रात विद्यापीठातील सेवानिवृत्त झालेल्या व सन 2016 मधे सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयाकडून त्रुटी काढल्याने प्रलंबित आहेत. याबाबतची सविस्तर माहिती कळविण्यात आली व सद्यस्थिती 17 कर्माचाऱ्यांना विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेणेबाबत खालील पाच अडचणींची भर पडली असे कळविण्यात आले आहे.

या पत्राच्या शेवटच्या परिच्छेदात वरील सर्व अडचणी विचारात घेऊन नवीन निर्माण झालेली सर्व सरळसेवेची पदे जाहिरातीद्वारे व विद्यापीठाच्या गरजेनुसार भरण्याबाबत मान्यता द्यावी अशी विनंती शासनास करण्यात आली व त्यापुढे यासर्व बाबींचे निराकरण झाल्यानंतर पदभरतीबाबत विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळापुढे प्रस्ताव सादर करता येईल यास मान्यता असे कळविण्यात आले. मात्र, याबाबत शासनाचे अद्यापि मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

वरील सर्व 71 पदांचा विचार करता, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण 2015/प्रक्र 57/2015/विशि 1 दि. 14.1.2016 अन्वये लिपीक संवर्गात गट ड कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरावयाची मर्यादा संवर्ग संख्येच्या 25 टक्क्यांवरून 50 टक्क्यांपर्यंत करण्यात आली आहे. (परिशिष्ट 10) त्यामुळे दि. 25.2.2014 रोजीच्या शासन निर्णयातील सहायकांच्या मंजुर 50 पदांपैकी 25 पदे ही शिपाई संवर्गातून पदोन्नतीसाठी उपलब्ध राहतील व उर्वरित 25 सहायकांची पदे सरळसेवा भरतीने भरण्यास मान्यता द्यावी असे शासनास कळविण्यात आले.

सदर पत्र विद्यापीठात प्राप्त झाल्यानंतर करारावरील 17 कर्मचाऱ्यांनी दि.18.1.2016 रोजी विद्यापीठ सेवेत सामावून घेणेबाबत विनंती पत्र दिले आहे. त्यानंतर त्यानंतर दिनांक 12.2.2016 रोजी पहिले स्मरणपत्र, दिनांक 22.2.2016 रोजी दुसरे स्मरणपत्र, दिनांक 8.3.2016 रोजी तिसरे स्मरणपत्र पाठविले आहे.

| | | |
|---|---|---|
| | | व्य.मं.ठराव:<br>1. विद्यापीठाने सन 2008 मध्ये करार पध्दतीने नियुक्त केलेल्या 17 कर्मचाऱ्यांबाबत सदर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या सेवेत सहायक पदावर सामावून घेण्याच्या मागणीसाठी दि.28.3.2016 पासून विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर उपोषण केले होते. मात्र दि, 30 मार्च 2016 रोजी नाशिक येथील लोकप्रतिनिधीं समवेत उपोषणकर्ते नातेवाईक व इतर यांनी विद्यापीठ प्रांगणात येऊन मा. कुलगुरु यांच्या दालनात घुसुन मा. कुलगुरु यांना केलेली अर्वाच्य शिवीगाळ, धमकी आणि केलेल्या अपमानकारक वर्तवणूकीबाबत, वर्तमानपत्रात आलेल्या बातमीनुसार व व्यवस्थापन सदस्यांना, विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी यांनी दिलेल्या निवेदनानुसार, व्यवस्थापन मंडळाच्या उपस्थित सदस्यांनी अत्यंत तीव्र शब्दात या घडलेल्या घटनेचा निषेद केला व अशाप्रकारची घटना पुन्हा घडू नये, विद्यापीठाचे पावित्र्य अबादित राखण्यासठी या संदर्भातील सर्व माहिती कुलपती तथा राज्यपाल यांना तात्काळ लेखी स्वरुपात पत्र पाठवून व या घडलेल्या प्रकाराबाबतचा निषेद नोंदवण्यात आला. याबाबतचा ठराव संमत करण्यात आला.<br>2. 17 पदे भरताना उदभवणाऱ्या अडचणी संदर्भात विद्यापीठाने यापूर्वी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना पाठविलेली पत्रे दि.23.2.2015, 3.2.2015 याबाबत पुन्हा सविस्तर मुद्देसुद पत्र पाठवून शासन पातळीवर प्रत्येक मुद्याबाबत लेखी स्वरुपात शासनाकडून उत्तर मागवून घ्यावे.<br>3. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन आदेश क्र.वायएमयु 2013 47) / 2013/विशि-1 दि.25/2/2014 च्या शासननिर्णयानुसार 71 पदे भरताना 17 करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या नियमित सेवेत समाविष्ट करण्याबाबत सकारात्मक विचार करण्याच्या दृष्टिने उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांचा कायेदशीर सल्ला घ्यावा.<br>4. माजी न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, यांच्या अध्यक्षतेखाली, विद्यापीठ अस्थापनेवर यापूर्वी भरलेली पदे व त्यांच्या नेमणूका याबाबत सत्यशोधन समिती गठीत करण्यात यावी.<br>वरीलप्रमाणे 1 ते 4 मुद्यांना मान्यता देण्यात आली. |
| 155.5.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय** |
| | 155.5.1 | विद्यापीठाच्या यश इन इंटरनॅशनल सेंटर येथे विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी लग्नसमारंभ किंवा धार्मिक कार्यक्रमासाठी आरक्षण करण्यास व नियमानुसार शुल्क आकारण्याबाबतचा विषय विचारार्थ सादर.<br>व्य.मं.ठराव: विद्यापीठाच्या यश इन इंटरनॅशनल सेंटर येथे विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी लग्नसमारंभ किंवा धार्मिक कार्यक्रमासाठी उपलब्धतेनुसार आरक्षण करण्यास व त्यासाठी प्रति व्यक्ती रु. 300/- व प्रत्येक रुमनुसार रु. 600/- आकारण्यास मान्यता देण्यात आली. (महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या कुटुंब व्याख्येप्रमाणे "कुटुंब" म्हणजे यथास्थिती शासकिय कर्मचाऱ्याबरोबर राहणारी त्याची पत्नी किंवा राहणारा तिचा पती आणि शासकीय कर्मचाऱ्याबरोबर राहणारी आणि संपूर्णपणे त्याच्यावर अवलंबून असणारी औरस मुले व सावत्र मुले याशिवाय या संज्ञेत शासकीय कर्मचाऱ्याबरोबर राहत असतील आणि संपूर्णपणे त्याच्यावर अवलंबून असतील तर त्याचे आईवडील किंवा बहीणी आणि अज्ञान भाऊ यांचा समावेश होतो.) |
| | | |

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ